नगरसचिव

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १०**

**डिसेंबर २०१०**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि. २० डिसेंबर २०१० रोजी दुपारी ४–०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात** (मनपा सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**प्रश्नोत्तरे**

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**स्थायी समितीचे ठराव**

<u>विषय क्र. ३७७</u>

संदर्भ : – १) मा.सुनिल टिंगरे व मा.बंडु गायकवाड यांचे दि. १९/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४३१ दि. १९/१०/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. २ विद्यानगर येथील सर्व्हे नं. ३५–१/२ येथील शाळेची इमारत बांधणेसाठी र.रु. १.२० कोटीचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र. ३०, पुणे मनपा वसाहती नव्याने बांधणे, वाकडेवाडी, पांडवनगर, राजेंद्रनगर, अंबिलओढा, घोरपडे पेठ क्र. ८ व ९ राजेवाडी, (एकूण तरतुद र.रुपये १३.६० कोटी) | १.२० कोटी | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| वॉर्ड क्र. २ विद्यानगर येथील सर्व्हे नं. ३५–१/२ येथील शाळेची इमारत बांधणे | --- | १.२० कोटी |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवंशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे डिसेंबर २०१० च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. २८२, दिनांक २४/११/२०१० चा झाला आहे.)

<u>विषय क्र. ३७८</u>

संदर्भ :– १) मा.सौ.पार्वती भडके व मा.दत्तात्रय ससाणे यांचे दि. १९/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४४५, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.४४ मध्ये काळूबाई मंदिर ते सोलापूर रोड पश्चिम बाजूस भैरोबा नाल्यापर्यंत सोलापूर रोडच्या उत्तर बाजुने पावसाळी लाईन टाकणेसाठी र.रु.४० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| <u>अर्थशिर्षक</u> | <u>कमी</u> | <u>अधिक</u> |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. २८, अ.क्र. १, मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड (मॅनहोल्स), उपमुख्य मलनि:सारण नलिका, मलनि:सारणासंबंधी इतर कामे, स्थापत्य कामे, साधनसामुग्री, (अ) शहराच्या मध्यवर्ती भागाच्या विकासासाठी, (यादी क्र.एस–६), ड्रेनेज लाईन टाकणे, पान क्र. ५०, अ.क्र. ५०, वॉर्ड क्र.४४ काळूबाई स्टॉप ते मोठया कॅनॉलपर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे. | ४० लाख | --- |

<u>नविन सुचविलेले काम</u>

| | | |
|---|---|---|
| वॉर्ड क्र.४४ मध्ये काळूबाई मंदिर ते सोलापूर रोड पश्चिम बाजूस भैरोबा नाल्यापर्यंत सोलापूर रोडच्या उत्तर बाजुने पावसाळी लाईन टाकणे | --- | ४० लाख |

<u>विषय क्र. ३७९</u>

संदर्भ :- १) मा.सौ.पार्वती भडके व मा.दत्तात्रय ससाणे यांचे दि. १९/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४४६, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. ४४ मध्ये स. नं. ४७, ५२, ५३ व ५४ मधील असणारे रोड कॉंक्रीटींग व ब्लॉक बसविणेसाठी र.रु.१ कोटीचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. १०, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे,(यादी एस-२),पान क्र. १९२, अ.क्र. १२३, वॉर्ड क्र.४४ मध्ये स.नं. ५२/५३ मधून भिमनगर ते बी.टी.कवडे रोडला जोडणाऱ्या रस्त्याचे काम करणे. | १ कोटी | --- |
| <u>नविन सुचविलेले काम</u> | | |
| वॉर्ड क्र. ४४ मध्ये स. नं. ४७, ५२, ५३ व ५४ मधील असणारे रोड कॉंक्रीटींग व ब्लॉक बसविणे | --- | १ कोटी |

<u>विषय क्र. ३८०</u>

संदर्भ :- १) मा.शांतीलाल मिसाळ व मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. १९/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४४७, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगरपालिका अग्निशामक दलाकडे 'फायरमन' या पदाच्या दि.१/११/२००७ रोजी (वेतनश्रेणी २६१० ते ४००० +मान्य भत्ते) याप्रमाणे नेमणुका करण्यात आल्या. मात्र वर नमूद दिनांका पूर्वीच्या व नंतरच्या 'फायरमन' या पदाच्या नेमणुका (२८८० ते ५७८० + मान्य भत्ते) या वेतनश्रेणीवर करण्यात आल्या आहेत. समान श्रम व समान वेतन तसेच अत्यावश्यक सेवा याचा विचार करून पुणे महानगरपालिकेची मान्य वेतनश्रेणी ही सर्व फायरमन सेवकांना समान वेतनश्रेणी (२८८० ते ५७८० + मान्य भत्ते) लागू करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र. ३८१</u>

संदर्भ :- १) मा.सौ.संगिता गायकवाड यांचे दि. २०/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४४९, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

औंधगांव महिला उद्योग संस्था, औंध, पुणे ७ ही सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी नोंदनीकृत संस्था आहे. या संस्थेमार्फत अनेक उपक्रम राबविली जात आहेत. उपक्रमासाठी त्यांना जागेची अडचण भासत आहे.

औंधगांव स.नं. १५४ याठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र इमारत बांधण्यात आली असून त्याठिकाणी दुसरा मजला रिकामा आहे. ही रिकामी जागा औंधगांव महिला उद्योग संस्था, औंध, पुणे ७ या संस्थेस सामाजिक, शैक्षणिक व उन्नतीचे कार्य करणेसाठी २९ वर्ष लिजने देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ३८२**

संदर्भ :- १) मा.राजेंद्र गोरडे व मा.किरण बारटक्के यांचे दि. २०/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४५०, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र.६२ मध्ये १) कोथरुड स.नं.८२ हिस्सा नं.२ ते४ याठिकाणी अत्याधुनिक व्यायाम शाळा बांधण्यासाठी र.रुपये ५ लाखाचे २) अत्याधुनिक व्यायाम साहित्य खरेदी करण्यासाठी र.रुपये ५ लाखाचे असे एकूण र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. १४६, अ.क्र. २, शहरातील विविध भाजी मंड्यामध्ये विकास कामे करणे, (यादी क्रं.एस–२९), पान क्र.२२६, अ.क्र.४, वॉर्ड क्र.६२ मध्ये महिला बचत गटासाठी मिनी मार्केट बांधणे. | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| १) कोथरुड स.नं.८२ हिस्सा नं.२ ते४ याठिकाणी अत्याधुनिक व्यायाम शाळा बांधणे. | --- | ५ लाख |
| २) अत्याधुनिक व्यायाम साहित्य खरेदी करणे. | --- | ५ लाख |

**विषय क्र. ३८३**

संदर्भ :- १) मा.अभिजीत शिवरकर व मा.विजय देशमुख यांचे दि. २१/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४५५, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे मनपा वॉर्ड क्र. ८९ वानवडीगांव येथील पुणे मनपाच्या महादजी शिंदे शाळेमध्ये नविन वर्गखोल्या बांधणेसाठी र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. १०, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी एस–२), पान क्र. १९५, अ.क्र. २२७, वॉर्ड क्र. ८९ शिवरकर रस्ता डांबरीकरण करणे, (जगताप चौक ते सोलापूर रोड बिगबाजार चौकापर्यंत) | २० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| पुणे मनपा वॉर्ड क्र. ८९ वानवडीगांव येथील पुणे मनपाच्या महादजी शिंदे शाळेमध्ये नविन वर्गखोल्या बांधणे | --- | २० लाख |

**विषय क्र. ३८४**

संदर्भ :- १) मा.विरेंद्र किराड व मा.अरुण धिमधिमे यांचे दि. २१/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४५६, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ७८ स्वामी समर्थ मंदिर येथे विविध ठिकाणी काँक्रीटींग इंटरलॉकींग ब्लॉक व विविध विकासाची कामे करणेसाठी र.रु. ५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र.११, शहरात विविध ठिकाणी समाज मंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्रं.एस १६), पान क्र. २२३, अनु. क्र. २८, वॉ.क्रं. ७८ मध्ये समाजमंदिर बांधणे (एकूण तरतूद र.रुपये १५ लाख) | ५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. ७८ स्वामी समर्थ मंदिर येथे विविध ठिकाणी काँक्रीटींग इंटरलॉकींग ब्लॉक व विविध विकासाची कामे करणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ३८५**

संदर्भ :- १) मा.नितीन जगताप व मा.सौ.पार्वती भडके यांचे दि. २/६/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. २८१ दि. ८/६/२०१०.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/पापु/६४७ दि. १५/१०/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. १४५९, दि. ३०/११/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

वॉर्ड क्र. ३३ मध्ये जनता वसाहत जनवाडी येथे ४ इंची सी. आय. पाण्याची लाईन टाकणेसाठी र.रु. ७० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, क अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २६, अ.क्र. ३, शुध्द पाण्याच्या मुख्य नलिका टाकणे, (अ) शहराच्या मध्यवर्ती भागाच्या विकासासाठी, (यादी क्रं. एस-५), पान क्र.४१, अ.क्र.५०, वॉर्ड क्र.३३ शिवाजी हौसिंग सोसायटी व परिसरात वॉटर लाईन टाकणे. | ३० लाख | --- |
| १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. १४०, अ.क्र. २९, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र.एस-२७),पान क्र. २२७, अ.क्र.१३, वॉर्ड क्र.३३ जनवाडी मशिदीच्या मागे मोकळया जागेत गार्डन विकसित करणे. | ४० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. ३३ मध्ये जनता वसाहत जनवाडी येथे ४ इंची सी.आय.पाण्याची लाईन टाकणे | --- | ७० लाख |

**विषय क्र. ३८६**

संदर्भ :- १) मा. ॲड्. प्रसन्न जगताप, उपमहापौर, मा. उज्ज्वल केसकर व मा. विरेंद्र किराड यांचे दि. २०/७/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ५६९ दि. २९/७/२०१०.
३) मा. अति. महा. आयुक्त ( ज ) यांनी क्रं. मआ/विका क्र.३/६५५, दि.१८/१०/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. १४६१, दि. ३०/११/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

१) वॉ.क्र.१२७ मध्ये जॉगींग ट्रॅक व कॅनॉल लगत सिमाभिंत बांधण्यासाठी र.रुपये १० लाखाचे २) वॉ.क्र.१२७ मध्ये मारुती मंदिराजवळ समाज विकास केंद्र बांधणे, विरंगुळा केंद्र बांधण्यासाठी र.रुपये १८ लाखाचे ३) वॉ.क्र.१२७ मधील कॅनॉल व ओढ्या लगत लोखंडी पाईप व ग्रील लावून संरक्षक रेलिंग बांधणेसाठी र.रुपये २ लाखाचे असे एकूण र.रु. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–११ चे अंदाजपत्रक ,<br>१) १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. १४६, अ.क्र. २, शहरातील विविध भाजी मंड्यामध्ये विकास कामे करणे, (यादी क्रं.एस–२९), पान क्र. २२६, अ.क्र.१६, वॉ. क्र. १२७ मध्ये भाजी मंडई बांधणे . | १५ लाख | --- |
| २) २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. ११६, अ.क्र. ४, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस–२३), पान क्र. २१५, अ.क्र.६२, वॉ. क्र. १२७ मधील हिंगणे खुर्द शाळा क्र.१६८ शाळेचा हॉल व वर्गखोल्या बांधणे व नुतनीकरण करणे | १५ लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे –** | | |
| १) वॉ.क्र.१२७ मध्ये जॉगींग ट्रॅक व कॅनॉल लगत सिमाभिंत बांधणे | --- | १० लाख |
| २) वॉ.क्र.१२७ मध्ये मारुती मंदिराजवळ समाज विकास केंद्र बांधणे, विरंगुळा केंद्र बांधणे | --- | १८ लाख |
| ३) वॉ.क्र.१२७ मधील कॅनॉल व ओढ्या लगत लोखंडी पाईप व ग्रील लावून संरक्षक रेलिंग बांधणे | --- | २ लाख |

**विषय क्र. ३८७**

संदर्भ :– १) मा.शिवाजी शिंदे यांचे दि. ९/७/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ५०८ दि. २३/७/२०१०.
३) मा. अति. महा. आयुक्त ( ज ) यांनी क्रं. मआ/विका क्र.२/६६५ दि. १८/१०/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. १४६२, दि. ३०/११/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

वॉर्ड क्र. ३ मध्ये हवालदार मळा व विविध ठिकाणी रस्त्यावर कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी र.रु. १५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदापत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. ११, शहरात विविध ठिकाणी गल्लीबोळ सिमेंट कॉंक्रीट करणे, (यादी क्र.एस–८), पान क्र. २००, अ.क्र. १, वॉर्ड क्र. ३ मध्ये हवालदार मळा व विविध ठिकाणी रस्त्यावर कॉंक्रीटीकरण करणे | १५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. ३ मध्ये हवालदार मळा व विविध ठिकाणी रस्त्यावर कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हींग ब्लॉक बसविणे | --- | १५ लाख |

**विषय क्र. ३८८**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/अनअ(प्रकल्प)/६९४ दि. २०/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १४९१, दि. ३०/११/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

पुणे पेठ बोपोडी स.नं. १०–अ(भाग) जुना जकातनाका येथील वाहनतळ ३ वर्षे मुदतीसाठी ठेका पध्दतीने चालविणेस देणेबाबत निविदा मागविली असता कन्फर्म ट्रॅव्हल्स यांची एकच निविदा र.रुपये २०,०००=२५ प्रति माह प्राप्त झाली असून मनपाने मासिक निर्धारित केलेल्या रक्कमेपेक्षा रुपये ३,१२५=२५ ने म्हणजेच वार्षिक र.रुपये ३७,५०३/– ने जास्त असल्याने त्यांचेकडून वार्षिक र.रुपये २,४०,००३/– (प्रतिमाह र.रुपये २०,०००=२५) दराने व प्रतिवर्षी ठेका रक्कमेत १०% भाडेवाढ करुन ताबा दिनांकापासून ३ वर्षे मुदतीसाठी टेंडर अटी व शर्तीनुसार चालविणेस देण्यास व त्याअनुषंगाने ठेकेदाराशी करार करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. ३८९</u>**

संदर्भ :- १) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/अनअ(वानि)/५३३ दि. ६/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५०८, दि. ३०/११/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

राजर्षि शाहू बसस्थानक, स्वारगेट येथील वाहनतळ ३ वर्षे मुदतीसाठी ठेका पध्दतीने चालविणेस देणेबाबत निविदा मागविली असता आलेल्या एकूण ६ निविदांपैकी सर्वात जास्त दर ठेकेदार मे.प्राजक्ता एंटरप्रायझेस (श्री.भानुदास गुलाबराव वैद्य) यांनी र.रुपये ३४,५००/– प्रति माह याप्रमाणे असून मनपाने निर्धारित केलेल्या रकमेपेक्षा र.रुपये १०,३१३/– प्रतिमाह ने जास्त तसेच वार्षिक र.रुपये १,२३,७५६/– ने जास्त असल्याने त्यांचेकडून प्रतिमाह र.रुपये ३४,५००/– दराने (वार्षिक र.रुपये ३४,५००/– बाय १२ महिने = र.रुपये ४,१४,०००/– व प्रतिवर्षी ठेका रक्कमेत १०% भाडेवाढ करुन ताबा दिनांकापासून ३ वर्षे मुदतीसाठी टेंडर अटी व शर्तीनुसार चालविणेस देण्यास व त्याअनुषंगाने त्यांचेशी करार करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. ३९०</u>**

संदर्भ :- १) मा.सौ.रिना पवार यांचे दि. २२/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५१९, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १०३ दत्तवाडी येथील नवग्रह मंदिराजवळील कमानीचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण करणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणी संग्रहालये, पान क्र. १४०, अ.क्र. २९, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एस–२७), पान क्र. २२९, अ.क्र. ९१, वॉर्ड क्र. १०३ दत्तवाडी मदर तेरेसा गार्डन येथील रामभाऊ म्हाळगी हॉलवरील दुसरा मजला बांधणे | १० लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम</u>** | | |
| वॉर्ड क्र. १०३ दत्तवाडी येथील नवग्रह मंदिराजवळील कमानीचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण करणे | --- | १० लाख |

**<u>विषय क्र. ३९१</u>**

संदर्भ :- १) मा.प्रा.विकास मठकरी यांचे दि. २५/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५२३, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ५६ लॉ कॉलेज रोड वि.स.खांडेकर चौक ते आठवले चौकापर्यंत रस्त्यावर डिव्हायडर बसविणेकरीता र.रु. ३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतुन करावयाची कामे, पान क्र. १७०, अ.क्र. १, निरनिराळ्या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस–४), पान क्र. २३१, अ.क्र. ५०, वॉर्ड क्र. ५६ मध्ये गवनि सुधारणा कामे व समाजमंदिर बांधणे | १५ लाख | --- |
| ५.लोकारोग्य, पान क्र. ११८, अ.क्र. १०, शहरात स्मशानभूमींमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र. एस–२४), पान क्र. २१६, अ.क्र. ११, वॉर्ड क्र. ५६ मध्ये सफाई कामगार कोठी बांधणे, कोड सीई१५ए२३८/एस२४–६१ | १५ लाख | --- |

**नविन सुचविलेले काम**

| | | |
|---|---|---|
| वॉर्ड क्र. ५६ लॉ कॉलेज रोड वि.स.खांडेकर चौक ते आठवले चौकापर्यंत रस्त्यावर डिव्हायडर बसविणे | --- | ३० लाख |

**विषय क्र. ३९२**

संदर्भ :- १) मा.अनिल भोसले यांचे दि. २५/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५२५, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. २३ मध्ये भारती सोसायटी, गितांजली सोसायटी व इतर सोसायटी परिसरामध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकरीता र.रु. ४५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. ११, शहरात विविध ठिकाणी गल्लीबोळ सिमेंट काँक्रीट करणे, (यादी क्र. एस-८), पान क्र. २००, अ.क्र. १९, वॉर्ड क्र. २३ मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळ काँक्रीट करणे व डांबरीकरण करणे | ४५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. २३ मध्ये भारती सोसायटी, गितांजली सोसायटी व इतर सोसायटी परिसरामध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | ४५ लाख |

**विषय क्र. ३९३**

संदर्भ :- १) मा.अनिल भोसले यांचे दि. २५/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५३२, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. २२ मध्ये प्रीत अपार्टमेंट, संकल्प सोसायटी व इतर सोसायटी परिसरामध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकरीता र.रु. ४५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. १०, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी क्र. एस-२), पान क्र. १९१, अ.क्र. ६५, वॉर्ड क्र. २२ मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळ काँक्रीट करणे व डांबरीकरण करणे | ४५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. २२ मध्ये प्रीत अपार्टमेंट, संकल्प सोसायटी व इतर सोसायटी परिसरामध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | ४५ लाख |

**विषय क्र. ३९४**

संदर्भ :- १) मा.संतोष फरांदे व मा.हनिफ शेख यांचे दि. २७/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५३४, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १४३ मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरणे करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १० ग विद्युत विभाग, पान क्र. १२८, अ.क्र. १०, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र.एस-३), विद्युत विभागाकडील याद्या, पान क्र.२१२, अ.क्र.२९५, वॉर्ड क्र.१४३मधील रस्त्यामधील धोकादायक विद्युत पोल काढुन अंडरग्राउंड केबल टाकणे. | २५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १४३ मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरणे करणे. | --- | २५ लाख |

**विषय क्र. ३९५**

संदर्भ :- १) मा.संतोष फरांदे व मा.हनिफ शेख यांचे दि. २७/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५३५, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. १४३ मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणेसाठी करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १० ग विद्युत विभाग, पान क्र. १२८, अ.क्र. १०, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र.एस-३), विद्युत विभागाकडील याद्या, पान क्र.२१२, अ.क्र.२९६, वॉर्ड क्र.१४३ मध्ये विविध ठिकाणी अंडरग्राउंड केबल टाकणे. | २० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १४३ मध्ये विविध ठिकाणी गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणे | --- | २० लाख |

**विषय क्र. ३९६**

संदर्भ :- १) मा.किरण बारटक्के व मा.अविनाश बागवे यांचे दि. २५/८/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ९०८, दि. १४/९/२०१०.
३) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी क्रं. मआ/अनअ(पथ)/७२४ दि. २६/१०/२०१० ने पाठविलेला अभिप्राय.
४) स्थायी समिती ठराव क्र. १५३७, दि. ३०/११/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

वॉर्ड क्र. ११० मध्ये स.नं. १०७/१०/१०८/१ओ/८ नविन स.नं. १०८/१/६/२ जलतरण तलावाचे उर्वरित काम करणेसाठी र.रु. ४२.७५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. ४०, सन २००९-१० मध्ये सुचविण्यात आलेली कामे परंतू ३१ मार्च २०१० नंतर खर्च पडत असल्याने सुचविण्यात आलेली कामे (यादी क्र.झेड-१), पान क्र.२३५, अ.क्र.४५, वारजे वॉ.क्रं.११० पॉप्युलनगर वारजे येथील संघर्षनगर ते सहयोगनगर पाण्याच्या टाकी पर्यंत रस्ता करणे, | ३२.७५ लाख | --- |
| १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र. १४, भवन विभागातंर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी एस-२६), पा.क्र.२२०, अ.क्र. ९५, वॉर्ड क्र.११० मध्ये विरंगुळा केंद्र बांधणे. | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| स.नं.१०७/१०/१०८/१ओ/८ नविन स.नं.१०८/१/६/२ जलतरण तलावाचे उर्वरित काम करणे. | --- | ४२.७५ लाख |

**विषय क्र. ३९७**

संदर्भ :- १) मा.सौ.रंजना टिळेकर, सभासद, पुणे मनपा यांचे दि. २६/७/२०१० चे पत्र.
२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूमीप्रापण/६९५ दि. २५/१०/२०१० चे पत्र.
३) मा.ॲड्.निलेश निकम, सभागृह नेता व मा.उज्ज्वल केसकर यांची दि.३०/११/२०१० ची उपसूचना.
४) स्थायी समिती ठराव क्र. १५७७, दि. ३०/११/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १४० कोंढवा बु. येथील सध्याची स्मशानभूमी ही कोंढवा–कात्रज बाह्यवळण मार्गावरील रस्तारुंदीकरणामध्ये येत असलेली स्मशानभूमी ही पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ठ झालेल्या गावांपैकी कोंढवा बु. हे गांव असून सदर गावातील नविन विकास योजना आराखड्यानुसार स.नं. ५५ (सीआर–१२) ह्या जागेत सदरची स्मशानभूमी स्थलांतरीत करणेबाबत मा.सौ.रंजना टिळेकर यांनी संदर्भांकित पत्रान्वये सुचविले आहे. तथापि बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय यांचे कार्यालयामार्फत अद्याप सदरचा विकास योजना आराखडा हा मे. शासनाकडून मंजूर झालेला नसल्यामुळे पुढील कार्यवाही करणेत आलेली नाही असे कळविण्यात आलेले असून पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ठ झालेल्या प्रारुप आराखड्यातील कोंढवा बु. स.नं. ५५ येथील स्मशानभूमीसाठी आरक्षित जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये संपादन करणेस तसेच पुणे शहरातील जुन्या १९८७ व नविन समाविष्ठ हद्दीचे डेव्हलपमेंट प्लॅनमधील दर्शविलेल्या सर्व स्मशानभूमी, दफनभूमी त्वरीत ताब्यात घेण्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही चालू करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ३९८**

संदर्भ :- १) मा.शैलेंद्र नलावडे व मा.संजय नांदे यांचे दि. २९/१०/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५८३, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १२४ खालील विविध कामे करणेसाठी ४० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र. १४, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे, (यादी एस–२६),पान क्र. २२१, अ.क्र. ११०, वॉर्ड क्र. १२४ श्री गौड ब्राम्हण समाज मंदिर ते राजयोग सोसायटीपर्यंत अंबिल ओढ्याला सिमाभिंत बांधणे | ४० लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १) कै.चिंतामणराव देशमुख उर्दु प्राथमिक विद्यालय येथे शाळा बांधणे | --- | २० लाख |
| २) वॉर्ड क्र. १२४ मध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| ३) इंदिरानगर लोअर येथील व्यायामशाळेचा वरील मजला बांधणे | --- | ५ लाख |
| ४) बिबवेवाडी ओटा येथील गार्डनमध्ये लोखंडी शेड उभारणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ३९९**

संदर्भ :- १) मा.ॲड्.प्रसन्न जगताप, उपमहापौर व मा.अरुण धिमधिमे यांचे दि. २/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५८४, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १२७ मध्ये विविध ठिकाणी लाईटचे पोल बसविण्यासाठी २.५० लाखाचे व वॉर्ड क्र.१२७ मधील विश्रांतीनगर व विविध ठिकाणच्या रस्त्याचे ग्राऊट करण्यासाठी २.५० लाखाचे असे एकूण र.रु. ५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ अंदाजपत्रक, १६.उद्याने, प्राणी संग्रहालये, पान क्र. १४०, अ.क्र. २९, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी एस–२७), पान क्र. २२९, अ.क्र. ८०, वॉर्ड क्र. १२७ मधील विविध ठिकाणी खेळणी साहित्य व उद्यानाची निगा राखणे | ५ लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १) वॉर्ड क्र. १२७ मध्ये विविध ठिकाणी लाईटचे पोल बसविणे | --- | २.५० लाख |
| २)वॉर्ड क्र.१२७ मधील विश्रांतीनगर व विविध ठिकाणच्या रस्त्याचे ग्राऊट करणे | --- | २.५० लाख |

**विषय क्र. ४००**

संदर्भ :– १) मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि. ९/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६०१, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ४५ मध्ये खालील कामांसाठी र. रु.२५ लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. १४६, अ.क्र. २, शहरातील विविध भाजी मंड्यांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र. एस–२९), पान क्र. २२६, अ.क्र. ३, वॉर्ड क्र. ४५ विकासनगर घोरपडी मध्ये महिला बचत गटासाठी व्यापार संकुल बांधणे. | २५ लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| १)स.नं.७२ श्रावस्तीनगर नगर घोरपडी गांव येथील स्विमिंग पूलाचे उर्वरित काम करणे. | --- | १५ लाख |
| २)स.नं.७२ श्रावस्तीनगर येथील प्ले ग्राउंड विकसित करणे. | --- | १० लाख |

**विषय क्र. ४०१**

संदर्भ :– १) मा.प्रमोद निम्हण व मा.सुनिल गोगले यांचे दि. १५/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६०९, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ३० पाषाण गाव महिला उद्योग संस्था व जय भवानी प्रतिष्ठान, पुणे २१ ही गेली १५ वर्षापासून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी नोंदणीकृत संस्था आहे. या संस्थेमार्फत अनेक समाजउपयोगी उपक्रम राबविले जात आहेत. उपक्रमांसाठी त्यांना जागेची अडचण भासत आहे. पाषाण गाव स.नं. ४९ याठिकाणी बांधलेली वास्तू वरील संस्थेस सामाजिक कार्यालयासाठी भाडे तत्वावर देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ४०२**

संदर्भ :– १) मा.भिमराव खरात व मा.अविनाश जाधव यांचे दि. १५/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६१०, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ७ लोहगांव विमानतळमधील खुळेवाडी येथे रस्ते ग्राऊट करणे व पेव्हर करणेकरीता र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ अंदाजपत्रक, ५.लोकारोग्य, पान क्र. ११८, अ.क्र. १०, शहरात स्माशानभूमींमध्ये विकासाची कामे करणे (यादी एस–२४) पान क्र. २१६, अ.क्र. २, वॉर्ड क्र. ७ लोहगांव विमानतळ मध्ये खुळेवाडी येथे स्मशानभूमी बांधणे | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेली कामे** | | |
| वॉर्ड क्र. ७ लोहगांव विमानतळमधील खुळेवाडी येथे रस्ते ग्राऊट करणे व पेव्हर करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ४०३**

संदर्भ :– १) मा.श्रीकांत पाटील यांचे दि.२२/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६२४, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिके तर्फे शनिवारवाडा सांस्कृतिक महोत्सवा अंतर्गत शनिवारवाडा पटांगण, हडपसर, धनकवडी, बोपोडी, कोथरुड येथे सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रित्यर्थ बोपोडी येथे झालेल्या सांस्कृतिक महोत्सवाचे कार्यक्रमाप्रसंगी स्टेज, मंडप, तसेच साउंड सिस्टीम, लाईट, स्पीकर इ. ची व्यवस्थेप्रित्यर्थ संबंधित बिलधारकांची बिले आदा करणेसाठी रक्कम रु. ७ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१० – २०११ चे अंदाजपत्रक, १. मुख्य देखरेख वसुली वगैरे, क.महानगरपालिका व स्थायी समिती, १. नगरसचिव यांचे कार्यालय, पान क्रं.४३, अ.क्रं.८२, प्रबोधन विचारधारा कोथरुड क्रीडा महोत्सव प्रायोजकत्व स्विकारणे. | ७ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| शनिवारवाडा सांस्कृतिक महोत्सवा अंतर्गत बोपोडी गावठाण येथे झालेल्या कार्यक्रमाच्या स्टेज, मंडप, तसेच साउंड सिस्टीम, लाईट, स्पीकर इ. ची व्यवस्थेप्रित्यर्थ आलेल्या खर्चाची बिले आदा करणे | --- | ७ लाख |

**विषय क्र. ४०४**

संदर्भ :– १) मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे,मा.अजित आपटे यांचे दि.२३/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६२६, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं.१५ महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येथील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणेकरिता र.रु.१७ लाख रुपयांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–११ चे अंदाज पत्रक, १२.भवने भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्रं.१३८ अ.क्रं.५८, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येरवडा येथे सामाजिक सभागृह बांधणे. | १७ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं.१५ महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येथील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे. | --- | १७ लाख |

**विषय क्र. ४०५**

संदर्भ :– १) मा.अशोक हरणावळ व मा.बंडु गायकवाड यांचे दि. २५/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६२८, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १०० कै.भामरे सांस्कृतिक भवन (दर्शन क्रिडा प्रतिष्ठान) अर्धवट राहिलेले काम पूर्ण करणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र. ११६, अ.क्र.४, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस–२३), पान क्र. २१४, अ.क्र. ५२, वॉर्ड क्र. १०० मधील प्रकाश पवार शाळेतील धोकादायक वर्ग पाडून नव्याने विकासाची कामे करणे | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १०० कै.भामरे सांस्कृतिक भवन (दर्शन क्रिडा प्रतिष्ठान) अर्धवट राहिलेले काम पूर्ण करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ४०६**

संदर्भ :– १) मा.अशोक हरणावळ व मा.बंडु गायकवाड यांचे दि. २५/११/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १६२९, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १०० पर्वती दर्शन इंदिरा मिनी मार्केट शेजारील अर्धवट राहिलेल्या समाज मंदिराचे काम पूर्ण करणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ अंदाजपत्रक, ७.रुग्णालये, प्रसुतिगृहे व औषधालये, पान क्र. ११८, अ.क्र. ३, शहरात दवाखाने व रुग्णालयांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी एस–२५), पान क्र. २१७, अ.क्र. १५, वॉर्ड क्र. १०० पर्वती दर्शनमधील मित्र मंडळ चौकामधील मनपाचा धोकादायक दवाखाना (गोल दवाखाना) पाडून नव्याने बांधणे | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १०० पर्वती दर्शन इंदिरा मिनी मार्केट शेजारील अर्धवट राहिलेल्या समाज मंदिराचे काम पूर्ण करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ४०७**

संदर्भ :– १) मा.सौ.रजनी त्रिभुवन यांचे दि. २५/११/२०१० चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १६३०, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. ३८ मध्ये खालील कामे करणेसाठी र.रु. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १२२, अ.क्र. ११, शहरात विविध ठिकाणी गल्लीबोळ सिमेंट काँक्रीट करणे, (यादी क्र.एस– ८), पान क्र.२००, अ.क्र. २४, वॉर्ड क्र. ३८ सिटी पॉईंट ते पुणे सेंटर (बोट क्लब रोड, सिध्दार्थ पथ येथे रस्ता काँक्रीट करणे, | ५० लाख | --- |

**नविन सुचविलेली कामे**

| | | |
|---|---|---|
| १) वॉर्ड क्र. ३८ लोकसेवा वसाहत, कविता डेअरी, उल्हासनगर व विविध ठिकाणी फरशी बसविणे व ड्रेनेज लाईन टाकणे | --- | २५ लाख |
| २) वॉर्ड क्र. ३८ नदी किनारी, महात्मा फुले वसाहत, मारुती मंदिर परिसरात विविध ठिकाणी फरशी व ड्रेनेज लाईन टाकणे | --- | २५ लाख |

**मुख्य खात्यामार्फत निविदा प्रक्रिया करावी.**

**विषय क्र. ४०८**

संदर्भ :- १) मा.बाबु वागसकर यांचे दि. २६/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६४३, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. ४० (कोरेगांव पार्क) मधील कवडेवाडी याठिकाणी सुलभ शौचालय बांधणेकरीता र.रु. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, ४.गवनि निधीतून करावयाची कामे, पान क्र. १७०, अ.क्र. १, निरनिराळ्या गलिच्छ वस्तीत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्र.एस-४), पान क्र. २३०, अ.क्र. २८, वॉर्ड क्र. ४० मदारी वस्ती येथे सुलभ शौचालय बांधणे | २५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. ४० (कोरेगांव पार्क) मधील कवडेवाडी याठिकाणी सुलभ शौचालय बांधणे | --- | २५ लाख |

**विषय क्र. ४०९**

संदर्भ :- १) मा.बाबुराव चांदेरे व मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि. २९/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६४४, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

सन २०१०-११ महापौर चषक कबड्डी स्पर्धेसाठी र.रु. ३२.७५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, | | |
| १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र. १४, भवन विभागातंर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी एस-२६), पा.क्र.२१८, अ.क्र. २७, वॉर्ड क्र. २२ मुळा रोड येथे महिला उद्योग केंद्र बांधणे | २० लाख | --- |
| १७.खेळ व क्रिडांगणे, पान क्र. १४४, अ.क्र. ७, हरेकृष्ण पथ चित्तरंजन वाटीका येथे आर्टिफिशल क्लायबिंग वॉल बांधणे | १२.७५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| सन २०१०-११ महापौर चषक कबड्डी स्पर्धेसाठी | --- | ३२.७५ लाख |

**विषय क्र. ४१०**

संदर्भ :- १) मा.हनिफ शेख व मा.सुनिल टिंगरे यांचे दि. ३०/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६४५, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. १९ गणेश मंदिर समोरील भाग ड्रेनेज लाईन व काँक्रीटीकरण करणेकरीता र.रु. १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र.१३६, अ.क्र. ११, शहरात विविध ठिकाणी समाज मंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे, (यादी क्रं.एस १६), पान क्र. २२३, अनु. क्र. १७, वॉ.क्रं. १९ गणेशनगर, गणेशमंदिर समोरील हॉल वरचा मजला बांधणे | १५ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १९ गणेश मंदिर समोरील भाग ड्रेनेज लाईन व कॉंक्रीटीकरण करणे | --- | १५ लाख |

**विषय क्र. ४११**

संदर्भ :– १) मा.हनिफ शेख व मा.सुनिल टिंगरे यांचे दि. ३०/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६४६, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १९ पदवीधर बालवाडीच्या वरच्या मजल्याचे उर्वरित कामे करणेकरीता र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १३६, अ.क्र. १४, भवन विभागातंर्गत विविध विकासाची कामे करणे, (यादी क्रं.एस २६), पान क्र. २१८, अनु. क्र. २१, वॉ.क्रं. १९ नुराणी समोरील मोकळ्या जागेवर सांस्कृतिक हॉल बांधणे | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १९ पदवीधर बालवाडीच्या वरच्या मजल्याचे उर्वरित कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ४१२**

संदर्भ :– १) मा.हनिफ शेख व मा.सुनिल टिंगरे यांचे दि. ३०/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६४७, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १९ रहमत बालवाडी उर्वरित काम करणे व फर्निचर खरेदी करणे या कामासाठी र.रु. ८.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०–२०११ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंड्या व पशुवधगृहे, पान क्र. १४६, अ.क्र. ५, वॉ.क्रं. १९ मध्ये भाजी मंड्या विकसित करणे | ८.५० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १९ रहमत बालवाडी उर्वरित काम करणे व फर्निचर खरेदी करणे | --- | ८.५० लाख |

**विषय क्र. ४१३**

संदर्भ :– १) मा.सौ.दिपाली धुमाळ व मा.सुनिल टिंगरे यांचे दि. ३०/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६४८, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्र. १०९ वारजे जलशुध्दीकरण केंद्र मधील स.नं. ११९ येथील जलतरण तलावाचे उर्वरित कामे करणेकरीता र.रु. ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, ७.रुग्णालये, प्रसुतिगृहे व औषधालये, पान क्र. ११८, अ.क्र. ३, शहरात दवाखाने व रुग्णालयांमध्ये विकासाची कामे करणे, (यादी क्रं.एस २५), पान क्र. २१७, अनु. क्र. १८, वॉ.क्रं. १०९ स.नं. ११४/१ मॅटीर्निटी हॉस्पिटल बांधणे | ५० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १०९ वारजे जलशुध्दीकरण केंद्र मधील स.नं. ११९ येथील जलतरण तलावाचे उर्वरित कामे करणे | --- | ५० लाख |

**विषय क्र. ४१४**

संदर्भ :- १) मा.सुनिल टिंगरे व मा.शंकर पवार यांचे दि. ३०/११/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६५०, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

वॉर्ड क्र. ७३ मधील अंतर्गत रस्ते यु.टी.डब्ल्यु.टी.पध्दतीने विकसित करणेकरीता र.रु. २ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रक, पान क्र. १२६, अ.क्र. २३, शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारणेसाठी विविध विकास कामे करणे, (यादी एस-३०), पान क्र. २०४, अ.क्र.३८, मालधक्का चौक ते सोनमर्ग थिएटर उड्डाण पूल बांधणे | २ कोटी | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. ७३ मधील अंतर्गत रस्ते यु.टी.डब्ल्यु.टी.पध्दतीने विकसित करणे | --- | २ कोटी |

**विषय क्र. ४१५**

संदर्भ :- १) मा.उज्ज्वल केसकर, मा.गणेश बिडकर, मा.बंडु गायकवाड, मा.ॲड्.निलेश निकम,सभागृह नेते, मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.शंकर पवार, मा.संतोष आरडे, मा.सुनिल टिंगरे, मा. हनिफ शेख, मा. बाबु वागसकर, व मा.अशोक हरणावळ यांचे दि.३०/११/ २०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १६५१, दि. ३०/११/२०१०.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

चीनमध्ये नुकत्याच झालेल्या आशियाई क्रिडा स्पर्धेत भारतीय कबड्डी संघाने सुवर्णपदक मिळविले आहे. यामध्ये पुण्याची दिपिका जोसेफचा मोलाचा वाटा आहे.

तिच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे पुणे शहराच्या नावलौकीकात भर पडली आहे. तिला खास बाब म्हणून पुणे शहरात एक सदनिका मोफत देण्यास मान्यता देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## विधी समितीचा ठराव

**विषय क्र. ४१६**

संदर्भ :- १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उआ/से/७३७, दि. २६/१०/२०१० चे पत्र.
२) विधी समिती ठराव क्रं. ३३, दि. २५/११/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे महानगरपालिकेमध्ये प्राप्ती व चाचणीचे अर्थान्विक्षक (खुला गट) (वे. श्रे. १५,६०० ते ३९,१०० +८,१००(ग्रेड पे) + मान्य भत्ते) या पदावर नेमणूकीबाबत मा. निवड समितीने शिफारस केलेली खालील निवड/प्रतिक्षा यादीस तसेच सदर पदावर नेमणूक करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

–: निवडयादी :–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १ | श्री. मंडवाले कुणाल प्रभाकर | खुला |

–: प्रतिक्षायादी :–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १ | श्रीमती थिटे अमृता अभिजीत | खुला |

## शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्र. ४१७**

संदर्भ :– १) मा. वसंत मोरे व मा.शंकरराव बेलदरे यांचे दि.०९/०९/२०१० चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र.६३, दि. ९/९/२०१०
३) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ८०, दि. १२/१०/२०१०.

–––

संदर्भ क्र.२ अन्वये सदर विषयाची जागा पाहणी दि. ५/१०/२०१० रोजी करण्यात आली तसेच शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

आंबेगाव खुर्द स.नं.५/९ व ५/१० या मिळकतीमधील बी.पी.एम.सी.ॲक्ट १९४९ चे कलम २२४ अन्वये दि.३०/९/२००९ रोजी सार्वजनिक घोषित करण्यात आलेला २० फूटी पूर्वीचा रस्ता रद्द करून त्याच मिळकतीत पश्चिम हद्दीवर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम १४.४.१ जी.अन्वये स्थलांतरीत करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र. ४१८**

संदर्भ – १) आयुक्त पुणे महानगरपालिका,पुणे यांचे मआ/सह/से/१६६५,दि.१४/११/०५ व सोबत महानगरपालिका ठराव क्र.३४२, दि. २३/९/०५
२) आयुक्त पुणे महानगरपालिका,पुणे यांचे क्र.सहमआ/से/२२८०, दि.४/२/०६
३) मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्र.पी.एम.सी.३००५/३५६९/नवि.२२ नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई.३२ दि. १४/७/२००६
४) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सेप्रनि–१००३/प्र.क्र.८४/आस्था–२, मंत्रालय, मुंबई, दि.२९/३/०६
५) महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,सेवकवर्ग विभाग, पुणे महानगरपालिका जा.क्र. सआ/से/१९८१ दि.१०/१/२००० रोजीचे कार्यालय परिपत्रक.
६) उप आयुक्त ( ज ) कार्यालय सेवकवर्ग विभाग, पुणे महानगरपालिका जा.क्र.– उरा/से/१९५५, दि. १५/१०/२००१ रोजीचे कार्यालय परिपत्रक
७) अति.महा.आयुक्त ( ज ) कार्यालय,पुणे महानगरपालिका जा.क्र.अमआ/उरा/से/२६२२ दि.२०/२/२००३ रोजीचे आज्ञापत्र.
८) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्र.प्रशा/१ब/कावि/८६/२०१०, दि. २५/२/२०१० रोजीच्या पत्रान्वये मिळालेली पदोन्नती कार्यपध्दती
९) बृहन्मुंबई महानगरपालिका क्र.न.अ. /१७०१९/आसेप्र, दि. १६/११/२००९ रोजीचे परिपत्रक.
१०) मा.सुभाष जगताप व मा.सौ.राजलक्ष्मी भोसले यांचे दि. २२/१०/२०१० चे पत्र.
११) शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ९०, दि. २२/१०/२०१०.

––––

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

मा.मआ/उआ/से/४४४, दि. २९/९/२०१० मध्ये सादर केलेल्या विषयपत्रामध्ये मुख्य शहर सुधारणा समिती ठ.क्र.२५५, दि. ३/१०/२००७ वर अभिप्राय न देता मा.महाराष्ट्र शासनाचे निर्णय क्र.प्रानिमं–२००७/प्र.क्र.४६/०७/१३–अ मंत्रालय मुंबई ३२ दि. १९/१०/२००७ चा संदर्भ दिला आहे. तथापि सदरचा निर्णय हा मा.महाराष्ट्र शासनाकडील निवड समिती स्थापना व त्यांनी करावयाची रिक्त पदाची भरती यासाठी आहे. त्या मध्ये सेवेत असलेल्या सेवकांना पदोन्नती देण्यासंदर्भात काहीही उल्लेख नाही. त्यामुळे पुणे म.न.पा.मध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करणे योग्य होणार नाही. तथापि या पूर्वीचे निर्णय क्र.सेप्रनि–१००३/प्र.क्र.८४/आस्था–२, मंत्रालय,मुंबई,दि.२९/३/०६ मध्ये सेवेत असलेल्या सेवकांना

पदोन्नती देण्यासाठी आरक्षण ठेवले आहे.

पुणे मनपा सेवेत असलेल्या सर्व सेवकांना कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य ) या पदासाठी त्यांनी आवश्यक ती शैक्षणिक पात्रता प्राप्त केली असल्यास यापूर्वी पुणे म.न.पा.सेवेतील सेवकास पदोन्नती देण्यात आलेली आहे. तसेच मा.महाराष्ट्र शासनाकडील सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभाग या ठिकाणी संदर्भ क्र. ४ चे आदेशानुसार खात्यातील सेवकांना त्यांनी आवश्यकत्या शैक्षणिक पात्रता प्राप्त केली असल्यास पदोन्नती देण्यात येते. तसेच पिंपरी–चिंचवड महानगरपालिका संदर्भ क्र.८ व बृहन्मुंबई महानगरपालिका संदर्भ क्र.९ येथे सुध्दा खात्यातील सेवकांना पदोन्नती दिल्या जातात.

पुणे महानगरपालिके मध्ये सुध्दा यापूर्वी खात्यातील सेवकांना संदर्भ क्र. ५,६,७ अन्वये कनिष्ठ अभियंता ( स्थापत्य ) या पदाकरीता पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत.

तसेच पुणे महानगरपालिके कडील ज्युनिअर ग्रेड लेखनिक या पदाकरिता खात्यामार्फत संदर्भ क्र.३ नुसार पदोन्नती करीता काही जागा आरक्षित ठेवलेल्या आहेत.

वरील सर्व संदर्भ वस्तूस्थिती पाहता पुणे महानगरपालिके कडील सेवकांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील मंजूर पदांच्या सेवा प्रवेश महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सेप्रनि–१००३/ प्र.क्र.८४/आस्था–२, मंत्रालय, मुंबई, दि.२९/३/०६ नुसार व शासनाकडील (सेवाप्रवेश) नियम १९९८ मधील नियम शब्द व आकडेवारीतील गुणोत्तर २०.५.७५ असा ठेवण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## महिला बाल कल्याण समितीचे ठराव

**विषय क्र. ४१९**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उआ/से/४६४, दि. ४/१०/२०१० चे पत्र

२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्रं. ९९, दि. १३/१०/२०१०.

–––

पुणे मनपाच्या शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण या पदावर राज्य शासनाकडील श्रीमती पवार पुष्पलता सू, प्राध्यापक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – ३० यांची दि. २१/७/२०१० पासून प्रतिनियुक्तीचे सर्वसाधारण शर्ती /अटी नुसार शासन कळविल त्या मुदतीपर्यंत प्रतिनियुक्तीवरील शर्ती /अटींना अधिन राहून त्यांना देय असणारे वेतन व भत्ते यावर प्रतिनियुक्तीने केलेली नेमणूक मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

**विषय क्र. ४२०**

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/उआ/से/३७७, दि. ९/९/२०१० चे पत्र.

२) महिला बाल कल्याण समिती ठराव क्रं. १००, दि. १३/१०/२०१०.

–––

मा. अति. महा. आयुक्त ( वि ) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे मनपाचे आरोग्य खात्याकडील सॅनिटरी इन्स्पेक्टर वर्ग – ३ ( पे बँड रू.५२०० ते २०२०० + मान्य ग्रेड पे + मान्य भत्ते ) पदावरील नेमणूकीबाबत मा.सेवक निवड समितीने तयार केलेल्या ( अजा ३, इमाव ३ ) ( पैकी २ महिला ) व विजाअ १ जागा, अशा एकूण ७ जागांची निवडयादी व निवडयादीवरील उमेदवार हजर न झाल्यास रिक्त जागा भरून देण्याच्या दृष्टीने शासन निर्णय क्र. प्रानिमं–२००७/ प्र.क्र.४६/०७/१३, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दि.१९/१०/२००७ मधील परिच्छेद क्र. ८ व ९ मधील अटीस अधिन राहून अतिरिक्त निवडयादीवरील पाच उमेदवारांची ( अजा २ ( पैकी १ महिला ), इमाव २ ( पैकी १ महिला ), विजाअ १) शैक्षणिक पात्रता, आरक्षण, अनुशेष इत्यादी बाबी विचारात घेऊन मा.महा.आयुक्त यांनी नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) अन्वये मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**निवडयादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री.आहेर राजेश राम | अजा |
| २) | श्री.कांबळे श्रीधर अमृत | अजा |
| ३) | श्रीमती खरात कविता शशिकांत | अजा (महिला ) |
| ४) | श्री.उकिर्डे प्रमोद एकनाथ | इमाव |

| | | |
|---|---|---|
| ५) | श्री.भुजबळ प्रदिप महादेव | इमाव |
| ६) | श्रीमती कोकणी राहतबेगम अ.करिम | इमाव ( महिला ) |
| ७) | श्री.माने मंगलदास राजाराम | विजाअ |

**अतिरिक्त निवडयादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | जातीचा गट |
|---|---|---|
| १) | श्री.कदम कुलदिप रेवणसिध्द | अजा |
| २) | श्रीमती कांबळे मोहिनी शांताराम | अजा (महिला ) |
| ३) | श्री.शिंदे नानासाो दशरथ | इमाव |
| ४) | श्रीमती वासकर शिला लक्ष्मण | इमाव ( महिला ) |
| ५) | श्री.मोरे दत्तात्रय सदाशिव | विजाअ |

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– १०/१२/२०१०.

रमेश शेलार,
प्र. नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)